# ७४ व्या घटनादुरुस्तीने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना दिलेले आरक्षण आणि त्यानंतर रहिमतपूर नगरपालिकेच्या संदर्भात त्यांच्या बदललेल्या भूमिकेचा अभ्यास

**गायत्री अरुण चव्हाण** सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा तालुका - जावली, जिल्हा -सातारा

---

**प्रस्तावना :**

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात १९९२ ची ७४ वी घटनादुरुस्ती हा एक क्रांतीकारी टप्पा मानला जातो. या दुरुस्तीने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना (नगरपालिका आणि महानगरपालिका) घटनात्मक दर्जा दिला आणि महिलांसाठी ३३% जागा राखीव ठेवण्याची तरतूद केली (जी महाराष्ट्रात आता ५०% आहे). या दुरुस्तीचा मुख्य उद्देश महिलांना केवळ मतदानापुरते मर्यादित न ठेवता त्यांना प्रत्यक्ष सत्तेत आणि निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे हा होता. रहिमतपूर नगरपालिकेच्या संदर्भात, या कायद्यामुळे महिलांचे नेतृत्व 'उंबरठ्याबाहेर' येऊन प्रशासकीय पटलावर सक्रिय झाले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. ७४ व्या घटनादुरुस्तीनंतर सातारा नगरपालिकेतील महिला लोकप्रतिनिधींच्या राजकीय सहभागाचे स्वरूप अभ्यासणे.

२. महिला लोकप्रतिनिधींच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक पार्श्वभूमीचा त्यांच्या कार्यावर होणारा परिणाम तपासणे.

३. निर्णय प्रक्रिया, धोरण निश्चिती आणि अंमलबजावणीमध्ये महिलांची भूमिका किती प्रभावी आहे हे शोधणे

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत अभ्यासासाठी 'वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक' संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. यामध्ये नमुना निवड पद्धतीत रहिमतपूर नगरपालिकेतील महिला लोकप्रतिनिधींची मुलाखतीसाठी निवड करण्यात आली.

- प्राथमिक तथ्य संकलन : महिला लोकप्रतिनिधींच्या प्रत्यक्ष मुलाखती, प्रश्नावली आणि प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे माहिती गोळा करण्यात आली.
- दुय्यम तथ्य संकलन : नगरपालिकेचे वार्षिक अहवाल, जनरल प्रोसिडिंग बुक्स (ठराव), सरकारी गॅझेट्स, संदर्भ पुस्तके आणि जनगणनेची आकडेवारी यांचा वापर केला.

**विषय विवेचन :**

रहिमतपूर नगरपालिकेतील महिला लोकप्रतिनिधींच्या भूमिकेचे विश्लेषण केले असता, तेथील राजकीय अवकाश प्रामुख्याने कृषी-आधारित पार्श्वभूमी आणि कौटुंबिक राजकीय वारसा यांवर आधारलेला दिसून येतो. साताऱ्याच्या तुलनेत रहिमतपूरमध्ये युवा महिला लोकप्रतिनिधींचा सहभाग अधिक असून, त्या प्रामुख्याने पाणीपुरवठा, स्वच्छता आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत ग्रामविकासाच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करतात. या महिलांच्या राजकीय प्रवासात बचत गट आणि महिला मंडळांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली असून, या माध्यमातूनच त्यांचे नेतृत्व विकसित झाले आहे. मात्र, रहिमतपूरमध्ये ६४.२९% महिलांनी केवळ एकदाच निवडणूक लढवल्याने राजकारणातील त्यांच्या दीर्घकालीन सातत्यावर मर्यादा दिसून येतात. येथील महिला प्रतिनिधींना कुटुंबाचा भक्कम पाठिंबा मिळत असला तरी, प्रशासकीय निर्णयात कौटुंबिक हस्तक्षेप साताऱ्यापेक्षा अधिक जाणवतो. आर्थिक निर्णय प्रक्रियेत या महिलांचा सहभाग साताऱ्याच्या तुलनेत जास्त असला, तरी अंदाजपत्रकासारख्या तांत्रिक बाबींमध्ये त्यांना अधिक प्रशिक्षणाची गरज आहे. रहिमतपूरमधील महिला लोकप्रतिनिधींनी आपल्या प्रभागातील समस्यांसाठी प्रामुख्याने थेट जनसंपर्क आणि प्रत्यक्ष पाहणीवर भर दिला आहे, ज्यामुळे ग्रामीण प्रशासनात एक संवेदनशील आणि उत्तरदायी नेतृत्व निर्माण होत आहे.

**१. नेतृत्वाचे विकेंद्रीकरण आणि सामाजिक न्याय :**

७४ व्या घटनादुरुस्तीने स्थानिक राजकारणात केवळ महिलांना स्थान दिले नाही, तर सत्तेचे खऱ्या अर्थाने सामाजिक विकेंद्रीकरण घडवून आणले आहे. ५०% आरक्षणाच्या कायदेशीर तरतुदीमुळे साताऱ्यात केवळ उच्चवर्णीय किंवा प्रबळ राजकीय वारसा असलेल्या महिलांचे वर्चस्व संपुष्टात येऊन इतर मागासवर्गीय (OBC) आणि अनुसूचित जाती (SC) मधील महिलांनाही मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळाली आहे. या बदलामुळे सत्तेची दारे समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत उघडली गेली असून, विशेषतः ओबीसी प्रवर्गातून माळी, सोनार, शिंपी अशा विविध जातींच्या महिला लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आल्या आहेत. हे चित्र लोकशाहीच्या मुळांपर्यंत पोहोचलेल्या सक्षमीकरणाचे प्रत्यक्ष लक्षण असून, सामाजिक न्यायाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.

**२. प्रशासकीय सक्रियता आणि विकासात्मक दृष्टिकोन :**

साताऱ्यातील महिला लोकप्रतिनिधींची प्रशासकीय उपस्थिती ही केवळ कागदोपत्री मर्यादित नसून ती त्यांच्या प्रत्यक्ष कार्यातून आणि सक्रिय सहभागातून स्पष्टपणे दिसून येते. साताऱ्यातील महिला प्रतिनिधींची पालिकेच्या सर्वसाधारण सभांमधील उपस्थिती ७५% पेक्षा जास्त असून, त्या केवळ उपस्थिती न लावता आपल्या प्रभागातील लोकहिताच्या प्रश्नांवर लेखी आणि तोंडी स्वरूपात आग्रही मागण्या मांडताना दिसतात. महिलांच्या अंगी असलेल्या नैसर्गिक संवेदनशीलतेमुळे त्यांनी पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्य यांसारख्या मूलभूत नागरी सुविधांना आपल्या कामात सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. पुरुषांच्या तुलनेत महिला प्रतिनिधी घरातील आणि परिसरातील दैनंदिन समस्यांशी अधिक जवळून जोडलेल्या असल्याने त्यांच्या विकासकामांचा अजेंडा अधिक वास्तववादी आणि लोकभिमूख असल्याचे संशोधनातून स्पष्ट होते.

**३. समिती सहभाग आणि आर्थिक सक्षमीकरणाचे आव्हान :**

राजकीय प्रतिनिधित्व मिळाले असले तरी, निर्णय प्रक्रियेच्या केंद्रस्थानी असलेल्या समित्यांमध्ये महिलांचे स्थान अजूनही विषम असल्याचे दिसून येते. सातारा नगरपालिकेत 'महिला व बालकल्याण समिती' मध्ये महिलांचा सहभाग १००% असला तरी, ही समिती केवळ महिला व बालकांच्या मर्यादित विषयांवर कार्य करते. याउलट, नगरपालिकेची 'तिजोरी' मानल्या जाणाऱ्या स्थायी समिती (Standing Committee) आणि नियोजन समिती यांसारख्या महत्त्वाच्या आर्थिक निर्णय प्रक्रियेत महिलांचे प्रमाण १८.१९% इतके अत्यल्प आहे. जोपर्यंत महिला आर्थिक निर्णय घेणाऱ्या समित्यांमध्ये प्रभावी भूमिका बजावत नाहीत, तोपर्यंत त्यांचे राजकीय सक्षमीकरण खऱ्या अर्थाने पूर्ण होणार नाही. त्यामुळे आर्थिक अधिकार, अंदाजपत्रक आणि टेंडर प्रक्रिया यांसारख्या तांत्रिक बाबींमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग वाढवणे ही काळाची गरज आहे.

**४. दुहेरी जबाबदारी आणि कार्य-जीवन संतुलन :**

रहिमतपूर नगरपालिकेतील महिला लोकप्रतिनिधींना एकाच वेळी कौटुंबिक आणि राजकीय अशा दोन आघाड्यांवर संघर्ष करावा लागत आहे. संशोधनानुसार, सुमारे ६६.६६% महिला या प्रामुख्याने गृहिणी असून, राजकारण हे पूर्णवेळ कामाचे स्वरूप असल्याने घराची जबाबदारी, मुलांचे शिक्षण आणि प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडवणे यांत त्यांना मोठी कसरत करावी लागते. वेळेच्या नियोजनाचा विचार करता, कौटुंबिक कर्तव्यांमुळे अनेकदा महिला प्रतिनिधींना सायंकाळच्या किंवा रात्रीच्या वेळी होणाऱ्या राजकीय बैठकांना उपस्थित राहणे शक्य होत नाही, ज्यामुळे त्यांच्या राजकीय प्रगतीवर नैसर्गिक मर्यादा येतात. असे असूनही, रहिमतपूरमधील या महिला 'दुहेरी जबाबदारी'चे प्रभावी नियोजन करून आपले राजकीय अस्तित्व जिद्दीने टिकवून आहेत, ही या संशोधनाची सर्वात जमेची आणि सकारात्मक बाजू ठरली आहे.

**निष्कर्ष :**

- आरक्षणाचे यश: ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे साताऱ्यात महिलांचे केवळ संख्यात्मक प्रतिनिधित्व वाढले नाही, तर त्यांच्यात राजकीय जागरूकता आणि आत्मविश्वास निर्माण झाला आहे.
- स्वायत्ततेचा अभाव: निम्म्याहून अधिक महिलांच्या कामात आजही कौटुंबिक (पती किंवा नातेवाईक) हस्तक्षेप जाणवतो, जो त्यांच्या स्वतंत्र निर्णयक्षमतेत अडथळा ठरतो.
- प्रशासकीय दृष्टिकोन: महिला प्रतिनिधींना तांत्रिक बाबींचे (अंदाजपत्रक, कायदे) प्रशिक्षण दिल्यास त्यांचा सहभाग अधिक गुणात्मक होऊ शकतो.
- संवेदनशील प्रशासन: महिलांच्या सहभागामुळे नागरी प्रशासनात सर्वसामान्यांच्या गरजांप्रती अधिक संवेदनशीलता निर्माण झाली आहे.

**संदर्भ सूची :**

1. शासकीय दस्तऐवज: रहिमतपूर नगरपालिका, जनरल प्रोसिडिंग बुक (१९५२ ते २०२१).
2. कायदे: महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५.
3. पळशीकर, सुहास (२०१४), *भारतीय लोकशाही*, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
4. महाराष्ट्र शासन, *नगरपालिका प्रशासन मार्गदर्शिका*.
5. मुलाखत अनुसूची : रहिमतपूर नगरपालिकातील लोकप्रतिनिधी